महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

महाराष्ट्र शासन
सत्यमेव जयते

इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर-440 022

दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल- mahajyotingp@gmail.com


**जा.क्र.** महाज्योती /नागपूर/आस्था/477/2023-24 दिनांक :-20/02/2024

## -: परिपत्रक :-

**विषय :- UPSC (मराठी माध्यम) चे पुणे येथील प्रशिक्षणासाठी निवड करण्यासाठी अर्ज सादर करणेबाबत.**

1) UPSC प्रशिक्षणासाठी दि.29/10/2023 व दि.04/11/2023 रोजी परीक्षा घेण्यात आलेली होती.
2) UPSC मराठी माध्यमामध्ये जागा वाढ करण्याबाबत विद्यार्थ्यांनी मागणी केली होती. ती मागणी विचारात घेऊन दि.18/12/2023 रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत एकुण UPSC मराठी माध्यमाच्या प्रशिक्षणाकरीता 750 जागांची वाढ करण्याचा निर्णय झाला होता.
3) या निर्णयास मा. अ.मु.स (वित्त) यांच्या मान्यतेकरीता महाज्योतीने प्रस्ताव सादर केलेला होता. दि.20/02/2024 रोजी शासनाने सदर प्रस्तावास मान्यता प्रदान केल्याचे स्पष्ट केले आहे.
4) त्यानुसार विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी UPSC प्रशिक्षणासाठी परीक्षा देवून मेरीट यादीमध्ये स्थान प्राप्त केलेले आहे व अद्याप इंग्रजी माध्यमातील प्रशिक्षणासाठी रुजू झालेले नाहीत. **अश्या विद्यार्थ्यांनी परिपत्रकासोबत जोडलेल्या अर्जाचा नमूना भरुन महाज्योतीच्या** nagpurmahajyoti0@gmail.com **मेल तसेच** vikas.mahajyoti@gmail.com **आयडीवर दि.23/02/2024 रोजी 05.00 PM पर्यंत अर्ज करावा.**
5) इतर कोणत्याही मेल आयडीवर अर्ज पाठवल्यास सदरचा अर्ज गृहीत धरला जाणार नाही.
6) तसेच विहीत मुदतीत अर्ज प्राप्त न झाल्यास त्या विद्यार्थ्यांचा विचार केला जाणार नाही.
7) जे विद्यार्थी प्रशिक्षणास या आधीच रुजू झालेले आहेत, त्यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाही.
8) सर्व अर्जांची छाननी करुन परीक्षेत प्राप्त मेरीटच्या आधारेच पुढील यादी लावण्यात येईल याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

स्वा
(राजेश खवले)
**व्यवस्थापकीय संचालक**
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर

**दिनांक** :-

प्रति,
मा.व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती), नागपूर.

**विषय** :- **महाज्योतीच्या UPSC (मराठी माध्यम) परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी प्रवेश मिळणेबाबत**.

मा.महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, मी --------------------------- महाज्योतीची UPSC परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी परीक्षा दिलेली होती. त्याचा तपशील खालील प्रमाणे:-

| अ.क्र | विद्यार्थ्यांचे नाव | परीक्षेचा बैठक क्रमांक | परीक्षेत प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| 1 | | | |

माझी UPSC परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी निवड झालेली होती. मात्र मी ----------------------- --------------------- या कारणाने UPSC परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी रूजू होऊ शकलेलो नाही. मी इतर कोणत्याही संस्थेत इतर कोणत्याही परीक्षापूर्व प्रशिक्षणासाठी रूजू झालेलो नाही. तरी माझी निवड UPSC (मराठी माध्यम) परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी करण्यात यावी, अशी मी आपणांस या अर्जाद्वारे विनंती करीत आहे.

या अर्जा आधारे माझी निवड झाल्यास मी प्रशिक्षणासाठी तात्काळ रूजू होईल तसेच प्रशिक्षण पूर्ण करेल याची मी हमी देतो.

**आपला विश्वासु,**

स्वाक्षरी :-
नाव :-
मोबाईल नं. :-
ई-मेल :-
पत्ता :-